************************************ ISSN 2320-0197 **

# अर्थशास्त्राचे २०२४ चे नोबेल पारितोषिक: राष्ट्राच्या उभारणीत संस्थांच्या भूमिकेसाठी

**डॉ. समित माहोरे**
सहयोगी प्राध्यापक
पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग (स्वायत्त),
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर
Email- drsamitmahore@gmail.com

**गोषवारा:**

*अर्थशास्त्रातील 2024 चे नोबेल पारितोषिक डॅरोन एसेमोग्लू, सायमन जॉन्सन आणि जेम्स रॉबिन्सन यांना त्यांच्या संस्थात्मक अर्थशास्त्र विषयक संशोधनासाठी प्रदान करण्यात आले. त्यांच्या कार्याने समावेशक (Inclusive) आणि शोषक (Extractive) संस्थांच्या रचनेचा देशाच्या आर्थिक, राजकीय, आणि सामाजिक प्रगतीवर होणारा प्रभाव उलगडला आहे. त्यांनी वसाहतवादाचा अनुभव, संस्थात्मक टिकाऊपणा, आणि लोकशाही व्यवस्थेचा आर्थिक विकासाशी असलेला संबंध सविस्तरपणे विशद केला आहे. विशेषतः त्यांनी "Why Nations Fail" या ग्रंथाद्वारे जगभरातील आर्थिक विषमता, गरिबी, आणि समृद्धी यामागील कारणांचा सखोल मीमांसा केली आहे. त्यांच्या संशोधनाने जगभरातील राष्ट्रांच्या विकासासाठी समावेशक संस्थांचे महत्त्व अधोरेखित केले आहे. भारतासारख्या विकसनशील देशांसाठी, समावेशक संस्था निर्माण करून आर्थिक असमानता दूर करण्याचा दृष्टीकोन महत्त्वाचा ठरतो.*

**बीज-शब्द:** *नोबेल पारितोषिक 2024, अर्थशास्त्र, संस्थात्मक टिकाऊपणा, वसाहतवाद, समावेशक संस्था, शोषक संस्था, लोकशाही व आर्थिक विकास.*

**प्रस्तावना:**

अर्थशास्त्रीय विज्ञानाकरिता दिला जाणारा म्हणजेच अर्थशास्त्रातील २०२४ चे नोबेल पारितोषिक डॉरेन एसमोगलु, सायमन जॉन्सन आणि जेम्स रॉबिन्सन यांना विविध आर्थिक-राजकीय संस्थांची निर्मिती आणि त्याचा समाजाच्या प्रगतीवर होणारा परिणाम याविषयी केलेल्या संशोधनासाठी मिळाला आहे. या अर्थशास्त्रज्ञानी वर्षानुवर्षे प्रगती करूनही गरीब देशांचा विकास श्रीमंत देशांसारखा का झाला नाही? यावर अध्ययन केले आहे. युरोपियन वसाहतवाद्यांनी स्वत:च्या फायद्यासाठी अनुकूल असे कायदे करून अनेक देशांना गुलाम बनविले आणि शेकडो वर्षांच्या शोषण आणि गुलामगिरीमुळे हे देश विकासापासून वंचित राहिले. जागतिकस्तरावर देशादेशांमधील समृद्धी आणि दारिद्र्याचे मूळ कारण संस्थात्मक व्यवस्थेत असल्याचे प्रतिपादन या अर्थाशास्त्रज्ञांनी केले आहे. अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिक विजेते म्हणून त्यांच्या संशोधनाने जगभरातील सर्वसमावेशक संस्थांचा अर्थव्यवस्था व राजकारणावर मोठा प्रभाव पडला असल्याचे सिद्ध केले आहे. या संशोधनाने समावेशक संस्थांच्या महत्वाला अधोरेखित केले आहे. एखादा देश समृद्धीच्या दिशेने कशी यशस्वी वाटचाल करतो आणि काही देशांना विविध आर्थिक व सामाजिक समस्यांचा सामना का करावा लागतो याची कारणे त्यांनी आपल्या संशोधनातून स्पष्ट केले आहेत. या तिघांनीही संशोधनातून सर्वसमावेशक संस्था दीर्घकालीन वाढ आणि समृद्धीसाठी चांगल्या का आहेत याबरोबरच राजकीय तसेच आर्थिक संस्थांच्या परस्परसंबंधांचे विश्लेषण करून आर्थिक विकासाच्या प्रकियेत महत्वाचा दृष्टीकोन प्रदान केलेला आहे.

२०२४ वर्षीचे नोबेल पारितोषिक डॉरेन एसमोगलु, सायमन जॉन्सन आणि जेम्स रॉबिन्सन यांना आर्थिक तत्त्वज्ञान, सामाजिक आणि आर्थिक संरचनेवर अभूतपूर्व योगादानाकरिता प्राप्त झाले आहे. या संशोधनामुळे संस्था कशा तयार होतात, जागतिक

आर्थिक धोरणांवर कशा परिणाम करतात आणि सामान्यांच्या कल्याणावर अथवा आनंदावर त्याचा कसा प्रभाव पडतो याबाबत संशोधन केले आहे. त्यांनी आर्थिक समानता-असमानता, गरिबी निर्मूलन आणि आर्थिक विकास यासारख्या महत्त्वाच्या समस्यांवर संशोधन केले आहे. त्यांचा संशोधनामुळे जागतिकस्तरावरील भू-राजकीय धोरणे, सरकारे, संस्था, आणि धोरणकर्त्यांना उपयुक्त असा दृष्टीकोन मिळाला आहे. त्यांच्या संशोधनामुळे जगभरातील देशांच्या विकासाचे, समतोलाचे, विविध संस्थांचे आणि धोरणात्मक साधनांचे नव्या दृष्टीकोनातून पुनर्मूल्यांकन करणे शक्य झाले आहे.

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये २०२४ च्या अर्थशास्त्र नोबेल पारितोषिक विजेत्यांच्या कार्याचा मुख्य आशय, आर्थिक विकास व वसाहतवाद, युरोपियन वसाहतवादाचे प्रमुख उद्देश, लोकशाही व आर्थिक विकासामध्ये विविध सर्वसमावेशक संस्थांची भूमिका, संशोधनाची वर्तमानकालीन व भविष्यकालीन उपयुक्तता तसेच समाज, सरकार आणि जागतिक अर्थव्यवस्थेवर पडणारे प्रभाव यांचा आढावा घेण्यात आला आहे.

**नोबेल पारितोषिक विजेत्यांचा परिचय**

डॉरेन एसमोगलू यांचा जन्म तुर्की येथील इस्तबूल येथे ०३ सप्टेंबर १९६७ मध्ये झाला. १९९२ मध्ये त्यांनी लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड पॉलिटिकल सायन्स मधून पीएच. डी. प्राप्त केली. २०१९ मध्ये MIT येथे प्रोफेसर म्हणून नियुक्त झाले आहेत. त्यांना २००५ मध्ये जॉन बेट्स क्लार्क पदक आणि २०२४ मध्ये नोबेल पारितोषिक मिळाले. डॉरेन एसमोगलू प्रतिष्ठित अर्थशास्त्रज्ञ असून, त्यांचे संशोधन कार्यक्षेत्र आर्थिक विकास, तंत्रज्ञानाचा प्रभाव आणि संस्थात्मक संरचना यांवर आधारित आहे. डॉरेन एसमोगलू यांचे कार्य आधुनिक काळातील बाजार असमानता, रोजगाराच्या संभाव्यता आणि सामाजिक-आर्थिक समतोल साधण्यासाठी महत्त्वाचे मानले जाते.

सायमन जॉन्सन यांचा जन्म १६ जानेवारी १९९३ मध्ये लंडन येथे झाला. सायमन जॉन्सन हे इंग्लिश- अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ असून सध्या स्कूल ऑफ मॅनेजमेंट येथे प्राध्यापक आहेत. त्यांनी जागतिक आर्थिक व्यवस्थांवर प्रभाव टाकणाऱ्या धोरणांवरही काम केले आहे. सायमन जान्सन यांच्या संशोधनामुळे जागतिक राजकीय अर्थशास्त्रातील महत्वाचे मुद्दे प्रकाशात आले. "संस्थांची निर्मिती आणि ती समाजाच्या समृद्धीवर कसा परिणाम करते" यावर त्यांनी महत्वपूर्ण अभ्यास केला आहे.

जेम्स ऍलन रॉबिन्सन यांचा जन्म १९६० मध्ये झाला. त्यांनी लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स (LSE) मधून पदवीचे शिक्षण पूर्ण केले. त्यांनी अनेक वर्षे हार्वर्ड विद्यापीठात प्राध्यापक म्हणून कार्य केले. सध्या युनिव्हर्सिटी ऑफ शिकागोमध्ये पिअर्सन इन्स्टिट्यूट फॉर द स्टडी अँड रिझोल्यूशन ऑफ ग्लोबल कॉन्फ्लिक्ट्सचे संचालक आणि प्राध्यापक आहेत. जेम्स रॉबिन्सनच्या संशोधनाचा मुख्य विषय हा राजकीय अर्थशास्त्र, आर्थिक विकास आणि विषमता आहे. त्यांनी आपल्या संशोधनात समाजाच्या यशस्वीतेसाठी संस्थांचे महत्व विशद केले आहे. "Why Nations Fail: The Origins of Power, Prosperity, and Poverty" (२०१२) या पुस्तकाचे सहलेखन त्यांनी डॅरॉन एसिमोग्लू यांच्यासोबत केले आहे.

डॅरोन एसेमोग्लू आणि जेम्स ए. रॉबिन्सन यांनी *Why Nations Fail: The Origins of Power, Prosperity, and Poverty* या पुस्तकाच्यामाध्यमातून जगभरातील राष्ट्रांमधील आर्थिक विषमता, दारिद्र्य आणि समृद्धीच्या कारणांचे विश्लेषण केले आहे. या पुस्तकाद्वारे त्यांनी देशांची प्रगती किंवा अपयश केवळ भौगोलिक, सांस्कृतिक किंवा ऐतिहासिक कारणांवर अवलंबून नसून संस्थात्मक व्यवस्थेवर अवलंबून असल्याचे स्पष्ट मत मांडले आहे. हे पुस्तक आर्थिक विकासातील संस्थांच्या भूमिकेवर केंद्रित आहे आणि

यशस्वी राष्ट्रे कशी घडतात, याबद्दल सखोल विचार मांडते.

**संस्था आणि त्यांचे महत्त्व**

या अर्थशात्रज्ञांच्या मते, कोणत्याही देशाचा विकास हा त्या देशातील संस्थात्मक व्यवस्थेवर अवलंबून असतो. देशामध्ये जरी विविध घटक हे विकासाला कारणीभूत असले तरी त्यांनी दोन प्रकारच्या प्रमुख संस्थांचे महत्त्व विस्तृत केले आहे. देशाच्या विकासाला कारणीभूत संस्था म्हणजे समावेशक संस्था (Inclusive Institutions) होत. ह्या सर्वसमावेशक संस्था असून या संस्थांमध्ये कुठल्याही प्रकारच्या भेदभावाला महत्व न देता सर्व लोकांना समान राजकीय आणि आर्थिक संधी दिल्या जातात. समावेशक संस्थांमध्ये लोकांना आपले मत मांडण्याचे आणि राजकीय निर्णय प्रक्रियेत भाग घेण्याचे स्वातंत्र्य दिल्या जाते. अशा संस्थांमुळे नव नवीन तंत्रज्ञान, लहान मोठे व्यवसाय आणि उद्योगांची वाढ होते, ज्यामुळे देशाची सर्वसमावेशक प्रगती होते. सर्वच देशांना अशा प्रकारच्या विकासप्रेरक संस्थांची गरज असते.

दुसऱ्या बाजूने विचार करता देशांमध्ये शोषक संस्था (Extractive Institutions) सुध्या असतात. या संस्थांमध्ये काही विशिष्ट व्यक्ती किंवा गटांना महत्व देऊन त्यांच्याद्वारे जास्तीत जास्त सत्ता आणि संपत्ती एकवटली जाते. अशा संस्थांमुळे देशातील गरीब, असहाय्य, आणि मागासलेल्या लोकांचे शोषण होते. शोषक संस्थांमध्ये सत्ताधारी वर्ग समाजातील संसाधनांचा पुरेपूर फायदा घेतो आणि इतरांना प्रगती करण्यापासून रोखतो. अशा देशांमध्ये लोकशाहीच्या अभावा बरोबरच राजकीय आणि आर्थिक विकास मर्यादित राहतो तसेच तो समाजातील काही घटकांपर्यंतच मर्यादित असतो.

**संस्था आणि समृद्धी**

आर्थिक संस्था आणि समृद्धी यांच्यात कार्यकारण संबंध स्थापित करणे आव्हानात्मक जरी असले तरी अशक्य नाही. संस्थांच्या विकासाला अनेक घटक जबाबदार असतात. संस्थांच्या निर्मितीपासून त्यांच्या समृद्धीपर्यंतच्या प्रवासात राजकीय, आर्थिक, सामाजिक, अंतर्राष्ट्रीयसंबंध, देशांतर्गत संसाधनांची उपलब्धता यासारख्या अनेक घटकांचा समावेश होतो. तथापि, काळानुरूप अनेक ठिकाणी संस्थांची रचना जटिल अशा ऐतिहासिक घडामोडींनी आकारली जात असली तरी काही आर्थिक परिणाम साध्य करण्यासाठी सत्ताधाऱ्यांची जाणीवपूर्वक निवड देखील प्रतिबिंबित केली जाते. दुसऱ्या शब्दांत सांगायचे झाले तर संस्था ह्या अंतर्जात असतात.

आर्थिक संस्थांची संकल्पना कशी केली पाहिजे, त्यांचे पोषण कसे करावे आणि त्यांच्या विकासाचे किंवा समृद्धीचे मापन याबाबत सर्वस्वीकृत असे माप नाही त्यामुळे आकडेवारीच्या मर्यादा लक्षात घेता संस्थांची ऐतिहासिक उत्क्रांती पद्धतशीरपणे मोजणे कठीणच आहे. एसीमोग्लू, जॉन्सन आणि रॉबिन्सन यांनी आपल्या संशोधनामध्ये आर्थिक समृद्धीवर आर्थिक संस्थांच्या परिणामाच्या अभ्यासावर अधिक भर दिला आहे. विशेषतः, त्यांनी युरोपियन वसाहतवादाचा अनुभव "नैसर्गिक प्रयोगा"च्या माध्यमातून संरचनेवर - आधारित-किंवा अर्ध-प्रयोगात्मक-दृष्टिकोन म्हणून केला.

**वसाहतवाद, संस्था आणि आर्थिक विकास**

मागील काही शतकांत जगातील अनेक देशांमध्ये वसाहती स्थापन झाल्या आणि त्यामुळे काही देशांना त्याचा फायदा तर काहींना नुकसान भोगावे लागले. ह्या वसाहतकालीन समाजरचनेमुळे निर्माण झालेल्या सामाजिक व राजकीय संस्थांतून विधायक तसेच विध्वंसक अशा समाज घटकांची निर्मिती झाली आणि याचे परिणाम आर्थिक विकासावर होताना आपण पाहू शकतो. कोणत्याही देशाच्या आर्थिकव्यवस्थेत व समाजरचनेत महत्वाची भूमिका बजावणाऱ्या सामाजिक, आर्थिक व राजकीय संस्था काळानुसार कशा विकसित होत गेल्या व त्यातून आर्थिक प्रगतीमध्ये निर्माण होणारी

तफावत व विषमतेची दरी याचा सखोल अभ्यास डॉरेन एसमोगलु, सायमन जॉन्सन आणि जेम्स रॉबिन्सन या तीन अर्थशात्रज्ञांनी जगासमोर मांडला.

नवीन व्यापारमार्ग शोधणे आणि संपत्ती जमा करणे, मौल्यवान खनिजे, कच्चा माल, आणि गुलामांचा व्यापार करने हा मुख्य उद्देश युरोपियन वसाहतवादाचा होता. वसाहतवादाचे काही चांगले परिणाम आर्थिक विकासाला पूरक आहेत. यामध्ये प्रामुख्याने रेल्वे, दळणवळणाची साधने, आधुनिक तंत्रज्ञान, शिक्षण, आरोग्य सेवा, कौशल्य निर्मिती यांचा समावेश असून यामुळे देशाचा विविधांगी विकास होण्यास मदत झाली. युरोपियन वसाहतवादाने एकीकडे औद्योगिक आणि आधुनिकतेचा प्रसार तर केला, दुसरीकडे अनेक देशांच्या सामाजिक आणि आर्थिक शोषणावर भर दिला. वसाहतवाद हा जागतिक असमानतेसाठी मोठ्या प्रमाणावर जबाबदार आहे. त्याच्या आर्थिक, सामाजिक, आणि सांस्कृतिक परिणामांमुळे आजही विकसनशील देशांबरोबरच भारतालाही मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. भारताने वसाहतवादामुळे निर्माण झालेली असमानता दूर करण्यासाठी विकासाच्या सर्वसमावेशक उपाययोजना आणि ऐतिहासिक काळापासून चालत आलेल्या शोषणाची भरपाई करून देणाऱ्या धोरणाचा स्वीकार केला. भारतात ब्रिटीश राजवटीत शोषक संस्था तयार झाल्या. ह्या संस्थांनी स्थानिक लोकांना आर्थिक आणि सामाजिक लाभांपासून दूर ठेवले. स्वातंत्र्यानंतर, भारताने समावेशक लोकशाही संस्था उभारण्याचे प्रयत्न केले, परंतु अजूनही शोषक प्रवृत्ती काही प्रमाणात समाजव्यवस्थेत अस्तित्वात असल्याचे अनेक उदाहरणांवरून आपणास दिसून येते. इतिहासात काही महत्त्वाचे क्षण ज्यामध्ये राष्ट्रांनी या संधीचा उपयोग केला. जेव्हा देशांच्या संस्थांमध्ये बदल घडवता आले तेंव्हा या "टर्निंग पॉईंट" ला ज्या देशांनी समावेशक संस्था निर्माण केल्या, ते प्रगत झाले, तर ज्यांनी शोषक संस्था टिकवल्या, ते गरीब राहिले. औद्योगिक क्रांतीसारखे ऐतिहासिक क्षण याचे उत्तम उदाहरण आहे. आज वसाहतवाद, आर्थिक विकास आणि जागतिक विषमत्तेच्या माध्यमातून जागतिक अर्थव्यवस्थेच्या विकासावर झालेल्या चांगल्या-वाईट परिणामांची चर्चा या अर्थशास्त्रज्ञांनी घडवून आणलेली आहे.

त्यांनी "The Colonial Origins of Comparative Development: An Empirical Investigation" या २००१ साली प्रकाशित झालेलय लेखामध्ये संस्थांचे वर्गीकरण केले आणि ह्या संस्था एखाद्या राष्ट्राच्या विकासासाठी किंवा अधोगतीसाठी कशा कारणीभूत असतात यावर भर दिला. तसेच २००२ च्या "Reversal of Fortune: Geography and Institutions in the Making of the Modern World Income Distribution" या लेखात त्यांनी प्रायोगिक पुराव्याद्वारे विविध देशांमधील उत्पन्नात निर्माण होणारी असमानता ही भौगोलिक परिस्थिती व सांस्कृतिक घटकांमुळे घडून येत नसून बहुलवादी राजकीय संघटनाच प्रामुख्याने जबाबदार असतात हे दाखवून दिले.

**संस्थात्मक टिकाऊपणा आणि संस्थात्मक बदल**

डॅरोन एसेमोग्लू, सायमन जॉन्सन, आणि जेम्स रॉबिन्सन यांनी संस्थात्मक टिकाऊपणा (Institutional Persistence) आणि संस्थात्मक बदल (Institutional Change) यांवर सखोल भाष्य केले आहे. त्यांच्या मते, राष्ट्रांच्या प्रगतीत आणि दारिद्र्यात संस्थात्मक संरचना एक निर्णायक भूमिका बजावते. त्यांचे विचार मुख्यतः *संस्था कशा टिकतात आणि बदलतात यावर केंद्रित* आहे.

संस्था दीर्घकाळ टिकतात यामागील कारणे आणि त्याचे परिणाम याकरिता शक्तिशाली गटांचे वर्चस्व: महत्वपूर्ण भूमिका बजावते. शोषक संस्था (Extractive Institutions) प्रामुख्याने सत्ता आणि संपत्ती एका गटाकडे केंद्रीत करतात. हे सत्ताधारी गट संस्थांच्या टिकाऊपणासाठी प्रयत्न करतात, कारण त्या त्यांच्या हितसंबंधांना जपतात. अशा संस्थां बहुसंख्याक

लोकांच्या प्रगतीला बाधक ठरत असल्यामुळे त्या देशाच्या विकासामध्ये अडथळा निर्माण करतात. पूर्वी निर्माण झालेल्या शोषक संस्था वर्षानुवर्षे अनेक पिढ्यांपर्यंत टिकतात. उदाहरणार्थ, वसाहतवाद काळात तयार झालेल्या शोषक संस्थांचे प्रभाव आजही अनेक देशांमध्ये दिसून येतात. औपनिवेशिक व्यवस्थेने काही देशांमध्ये शोषण आणि असमानतेचे जाळे निर्माण केले, त्यामुळे त्या देशांच्या समावेशक संस्थांचा विकास खुंटला. दीर्घकाळ टिकणाऱ्या शोषक संस्थांमुळे विकासाला मर्यादा येतात आणि देश दारिद्र्याच्या दृष्टचक्रात अडकतो.

संस्थात्मक बदल हे विकासासाठी महत्त्वाचे आहेत. बदलांची प्रक्रिया स्पष्ट करताना देशांच्या इतिहासातील काही "महत्त्वाचे क्षण" किंवा "टर्निंग पॉईंट" (उदा. युद्ध, आर्थिक मंदी, तंत्रज्ञान क्रांती) संस्थात्मक बदल घडवून आणण्यास कारणीभूत ठरतात. अशा क्षणांमध्ये लोकांच्या मागण्या, तंत्रज्ञान, किंवा बाह्य घटनांमुळे शोषक संस्था संपुष्टात येऊ शकतात, आणि समावेशक संस्थांचा उदय होतो. उदाहरण: औद्योगिक क्रांतीमुळे अनेक देशांमध्ये समावेशक आर्थिक व्यवस्था विकसित झाल्या. जेव्हा लोकशाही आणि समावेशक संस्थांसाठी लोकांमध्ये दबाव निर्माण होतो, तेव्हा संस्थात्मक बदल शक्य होतो. उदा. युरोपमधील पुनर्जागरण आणि लोकशाहीचा उदय होय. संस्थात्मक बदल घडवण्यासाठी राजकीय सत्तेचे एकीकरण बदलले पाहिजे. सत्तेचे केंद्रीकरण कमी करून व्यापक सामूहिक सहभागावर भर दिला पाहिजे. सर्वसमावेशक राजकीय संस्था ही समावेशक आर्थिक संस्थांची प्राथमिक अट आहे. अशा प्रकारचे बदल घडतांना अनेक अडचणी येतात. बदलांना प्रस्थापित करण्याला सत्ताधाऱ्यांचा विरोध होतो. शोषक संस्था टिकवण्यासाठी ते मोठ्या प्रमाणावर राजकीय हस्तक्षेप करतात. उदाहरण: दक्षिण आफ्रिकेतील वंशभेद (Apartheid) संपवण्यासाठी झालेला मोठा संघर्ष.

*अनेकदा संस्थात्मक बदल घडवून आणणे सहज शक्य होत नाही. देशामध्ये संस्था ह्या खूप मजबूत असल्यास, बदल घडवण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागतो. काही देशांमध्ये क्रांती किंवा मोठ्या सामाजिक चळवळींमुळे बदल शक्य होतो, तर काही देशांत संस्थात्मक टिकाऊपणामुळे बदल थांबतो. उदा. अमेरिकेने औद्योगिक क्रांतीच्या काळात देशामध्ये सर्वसमावेशक संस्थांचे जाळे उभारले त्यामुळे देशामध्ये अनेक सकारात्मक बदल घडून देश प्रगती करू शकला. याउलट लॅटिन अमेरिकेतील वसाहतकालीन शोषक संस्था आजही अस्तित्वात असल्याने संसाधनांचे समान वितरण होत नाही देशांत निर्माण झालेल्या विविध सोयीसुविधा तळागाळापर्यंत पोहोचविल्या जात नाहीत. त्यामुळे काही देशांच्या विकासात अनेक अडथळे निर्माण होऊन विकास रेंगाळला असल्याचे दिसून येते.*

**लोकशाही व आर्थिक विकास**

राष्ट्राचा सर्वांगीण आर्थिक विकास व्हावा या हेतूने लोकशाही अधिक सुदृढ असावी असे मत त्यांनी संशोधनातून जगासमोर मांडले आहे. लोकशाही व्यवस्था कायद्याचे शासन (Rule of law) आणि समान अधिकार (Equal Right) सुनिश्चित करून आर्थिक विकासासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण करते. त्यांच्या "Democracy Does Cause Growth" या लेखात असे म्हटले कि लोकशाहीमध्ये आर्थिक विकास लवकर आणि प्रमाणशीर होतो. त्यांचे संशोधन मुख्यत: संस्थात्मक पायाभूत संरचनेच्या (Institutional Framework) आणि लोकशाही व्यवस्थेच्या आर्थिक समृद्धीशी संबंध स्पष्ट करते. त्यांच्या संशोधनातून असे दिसून आले की, संस्थात्मक रचना आणि लोकशाही व्यवस्थेचा आर्थिक समृद्धीशी घट्ट संबंध आहे. आर्थिक विकासाला अनुकूल आर्थिक वातावरणात चालना देण्याचे काम लोकशाही व्यवस्थेत केल्या जाते. तसेच समावेशक संस्था वैयक्तिक संपत्तीचे रक्षण,

बाजारपेठेतील अनुकूल स्पर्धेला चालना देणे आणि नवकल्पनांसाठी पोषक वातावरण निर्माण करतात.

**दोन शहरांची गोष्ट**

डॉरेन एसमोगलु, सायमन जॉन्सन आणि जेम्स रॉबिन्सन या तिघांनी आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत राजकीय आणि सामाजिक संस्थांचा सहभाग आणि भूमिका या क्षेत्रात मूलभूत संशोधन केले असून विविध देशाच्या प्रगतीमध्ये या संस्था किती महत्त्वाच्या आहेत हे पटवून देण्याकरिता दोन देशांच्या विकासातील तफावतीचे अनेक उदाहरणे दिली आहेत. पाश्चात्त्य युरोप, अमेरिका, आफ्रिका, दक्षिण आशिया, दक्षिण अमेरिका, पूर्व युरोप अशा जगभरातील देशांविषयी ५०० वर्षांहून अधिक काळातील विविध ऐतिहासिक उदाहरणाचा आढावा त्यांनी घेतला आहे.

दोन देशांच्या किंवा प्रदेशांच्या भिन्न विकास प्रवासाचा अभ्यास करण्यासाठी त्यांनी उत्तर कोरिया आणि दक्षिण कोरिया तसेच नोगालेस अरिझोना (अमेरिका) आणि नोगालेस सोनोर (मेक्सिको) यांचे तुलनात्मक विश्लेषण केले आहे. दोन्ही ठिकाणांच्या भौगोलिक परिस्थितीत समानता असूनही, तेथे जीवनमान, उत्पन्न, आणि आर्थिक प्रगतीत जमीन-अस्मानाचा फरक आहे. एकीकडे, अमेरिकेतील नोगालेसला लोकशाही राजकीय व्यवस्था, मजबूत कायदे, आणि समावेशक संस्था लाभलेल्या आहेत. येथे लोकांना शिक्षण, आरोग्यसेवा, उच्च उत्पन्न, चांगले जीवनमान, आर्थिक स्थिरता, आणि रोजगाराच्या समान संधी मोठ्याप्रमाणात उपलब्ध झाल्या आहेत. कायद्याच्या सुनियोजित अंमलबजावणीमुळे व्यवसायाला प्रोत्साहन मिळाले असल्याचे दिसून येते. दुसरीकडे मेक्सिकोतील नोगालेस मध्ये शोषक संस्था आहेत, ज्या भ्रष्टाचार, असमानता, आणि सत्तेच्या केंद्रीकरणामुळे बाधित झाल्या आहेत. येथे संसाधने विशिष्ट गटाकडे केंद्रीत आहेत आणि सामान्य लोकांना आर्थिक संधी मिळत नाहीत तसेच त्यांना कमी उत्पन्न, भ्रष्टाचार, आणि असुरक्षितता यासारख्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या दोन्ही ठिकाणी समान सांस्कृतिक, ऐतिहासिक, आणि भौगोलिक पार्श्वभूमी असूनही, या ठिकाणी प्रचंड आर्थिक आणि सामाजिक विषमता का आहे, हे संस्थात्मक दृष्टिकोनातून स्पष्ट केले आहे.

उत्तर कोरिया आणि दक्षिण कोरियामध्ये असमानता का आहे याचा अभ्यास केला असता असे दिसून येते कि दोन्ही देशांचा सांस्कृतिक आणि भौगोलिक वारसा समान आहे. १९४५ पूर्वी, हे एकाच कोरियन साम्राज्याचा भाग होते. परंतु १९४५ मध्ये दुसऱ्या महायुद्धानंतर, उत्तर कोरियावर साम्यवादी सत्तेची पकड बसली, तर दक्षिण कोरियाने लोकशाहीचा मार्ग स्वीकारला. उत्तर कोरियाने शोषक संस्था उभारल्या, जिथे संपत्ती आणि सत्ता एका सत्ताधारी गटाकडे केंद्रीत आहे. दक्षिण कोरियाने समावेशक संस्था तयार केल्या, ज्या सर्वसामान्यांना आर्थिक, शैक्षणिक, आणि सामाजिक प्रगतीच्या अनेक संधी उपलब्ध करून देतात. परिणामत: उत्तर कोरिया हा गरीब, शोषणयुक्त आणि हुकूमशाहीने ग्रासलेला देश असून येथील लोकांना मूलभूत स्वातंत्र्य आणि संसाधने मिळत नाहीत. दुसरीकडे दक्षिण कोरिया हा आशियातील एक विकसित अर्थव्यवस्था, तंत्रज्ञानाचे केंद्र, आणि लोकशाही मूल्यांवर आधारित देश आहे. या देशातील लोकांना स्वातंत्र्य, समानता असल्याने देशाची प्रगती झाली झाल्याचे दिसून येते.

समान भौगोलिक किंवा सांस्कृतिक पार्श्वभूमी असूनही, संस्थात्मक व्यवस्थेमुळे देशांच्या किंवा प्रदेशांच्या प्रगतीच्या मार्गात मोठा फरक पडतो. समावेशक संस्था प्रगतीसाठी आवश्यक आहेत, तर शोषक संस्था देशाला दारिद्र्य आणि स्थिरतेच्या अभावाकडे नेतात. भारताने लोकशाही व्यवस्था स्वीकारली आहे, परंतु शोषक संस्थांचे अवशेष अद्यापही समाज आणि अर्थव्यवस्थेत दिसून येतात. त्यामुळे भारत आजही अनेक आर्थिक, सामाजिक, राजकीय अशा समस्यांचा सामना करीत आहे.

लोकशाही आणि संस्थात्मक सुधारणांवर अधिक लक्ष केंद्रित केल्यास भारत अधिक प्रगत करू शकतो.

**समावेशक संस्था आणि भारत**

डॅरोन एसेमोग्लू, सायमन जॉन्सन, आणि जेम्स रॉबिन्सन यांनी त्यांच्या *Why Nations Fail: The Origins of Power, Prosperity, and Poverty* या पुस्तकामध्ये भारताचा थेट संदर्भ फारसा दिला नसला तरी, त्यांच्या सिद्धांतांच्या आधारे भारतातील परिस्थितीचा अभ्यास आपल्याला करता येतो. भारताच्या राजकीय, आर्थिक, आणि सामाजिक संस्थांवर त्यांच्या विचारांचा प्रभाव दिसून येतो, विशेषतः समावेशक आणि शोषक संस्थांच्या संदर्भात.

भारताने दीर्घकाळ ब्रिटिश वसाहतवाद अनुभवला आहे. भारतात ब्रिटिश राजवटीत शोषक संस्थांचा पाया घातला गेला. याचे उत्तम उदाहरण म्हणचे जमिनदारी प्रथा आणि असमान करप्रणाली होय. या शोषक संस्थांमुळे स्थानिक लोकांना आर्थिक प्रगतीपासून रोखले गेले. वसाहतवाद काळात, संसाधने आणि संपत्तीचा वापर प्रामुख्याने ब्रिटिश सत्ताधाऱ्यांच्या फायद्यासाठी केला गेला, त्यामुळे भारतात गरीबी आणि आर्थिक असमानता वाढली. आजही भारत गरीबी आणि असमानता यासारख्या समस्यांचा सामना करीत आहे.

स्वातंत्र्यानंतर, भारताने लोकशाही व्यवस्था स्वीकारली ती एसेमोग्लू, जॉन्सन, आणि रॉबिन्सन यांच्या समावेशक संस्थांच्या संकल्पनेशी सुसंगत आहे. भारताच्या संविधानाने सर्व नागरिकांना समान हक्क आणि संधी दिली. आर्थिक आणि सामाजिक सुधारणांसाठी ते एक महत्वपूर्ण पाऊल ठरले. परंतु, आजही काही क्षेत्रांमध्ये शोषक संस्थांचे अवशेष दिसून येतात, उदा. राजकीय आणि प्रशासकीय पातळीवर सर्रास होणारा भ्रष्टाचार, जातीवाद आणि आर्थिक विषमतेमुळे सर्वांसाठी निर्माण झालेली असमान प्रगती.

एसेमोग्लू, जॉन्सन, आणि रॉबिन्सन यांचा असा विश्वास आहे की समावेशक संस्था आर्थिक प्रगतीसाठी अनिवार्य आहेत. भारतातील ग्रामपंचायत, पंचायत राज प्रणाली, आणि मुक्त माध्यम व्यवस्था या समावेशक संस्थांच्या उदाहरणांमुळे लोकशाही मजबूत झाली आहे. परंतु, शैक्षणिक असमानता, आरोग्य सेवेची कमतरता, आणि सामाजिक सुरक्षा जाळ्याचा अभाव यामुळे प्रगतीला अडथळे निर्माण झाले आहेत. भारतात प्रगती होत असली तरी, संस्थात्मक टिकाऊपणामुळे (Institutional Persistence) काही बाबतीत बदल घडवणे कठीण झाले आहे. उदा. भूसुधारणा, प्रशासनिक पारदर्शकता, आणि न्यायव्यवस्थेतील विलंब यासारख्या समस्यांवर अद्यापही समाधानकारक उपाय सापडलेले नाहीत. तसेच शोषक संस्था बदलण्यासाठी व्यापक राजकीय इच्छाशक्ती आणि लोकसहभाग आवश्यक आहे. 1991 मध्ये भारताने नवीन आर्थिक धोरणांतर्गत अर्थव्यवस्थेचे उदारीकरण केल्यामुळे खाजगी क्षेत्राला प्रोत्साहन मिळाले. हि सुधारणा समावेशक संस्थांच्या दिशेने एक पाऊल होते, कारण यामुळे बाजारपेठेत स्पर्धा वाढवली आणि नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार करण्यात आला. परंतु, निवडक क्षेत्रांमध्ये एकाधिकार आणि सामान्य नागरिकांसाठी मर्यादित संधी या समस्या अजूनही कायम आहेत.

आजही भारतातील मोठ्या लोकसंख्येच्या उपजीविकेचे साधन शेती आहे. एसेमोग्लू, जॉन्सन, आणि रॉबिन्सन यांच्या सिद्धांतानुसार, शेतकऱ्यांना प्रोत्साहन देणाऱ्या समावेशक संस्थांची गरज आहे. यामध्ये पायाभूत सुविधा, शाश्वत कर्जप्रणाली, आणि तंत्रज्ञानाचा स्वीकार यांचा समावेश करता येईल. परंतु, आजही भारतातील कृषी व्यवस्थेमध्ये असमानता आणि शोषक प्रवृत्ती दिसून येतात. यावर मात करण्यासाठी संस्थात्मक सुधारणा आणि व्यापक धोरणात्मक बदलांची आवश्यकता आहे. भारताला एक प्रगत देश बनवण्यासाठी सर्व नागरिकांना समान आर्थिक,

सामाजिक, आणि राजकीय संधी उपलब्ध करून देणाऱ्या संस्थांची उभारणी करावी लागेल.

**समारोप**

आर्थिक प्रगती साधण्याकरिता जगातील विविध देशांची चढा-ओढ आणि त्यात राजकीय संस्था व सामाजिक संस्थेची कामगिरी याचा परस्पर संबंध या तीन अर्थतज्ज्ञांनी अगदी समर्पक उदाहरणे देऊन जगासमोर मांडला आहे. डॉरोन एसेमोग्लू, सायमन जॉन्सन, आणि जेम्स रॉबिन्सन यांचा असा विश्वास आहे की, कोणत्याही देशाला प्रगती करायची असेल, तर त्याने समावेशक संस्था निर्माण केल्या पाहिजेत. या संस्था लोकांना स्वातंत्र्य, सुरक्षा आणि संधी देणाऱ्या असाव्यात. सत्तेचे केंद्रीकरण टाळले पाहिजे आणि संसाधने सर्वांसाठी उपलब्ध करून दिली पाहिजेत.

'*Why Nations Fail*' हे पुस्तक संस्थात्मक संरचनेचा आणि त्याचा देशाच्या विकासावर होणाऱ्या परिणामाचा सखोल अभ्यास करते. नोबेल पारितोषिक विजेत्या अर्थशात्रज्ञांनी दाखवून दिले आहे की, देशाच्या समृद्धीचे किंवा दारिद्र्याचे मुख्य कारण त्याच्या संस्थांमध्ये दडलेले आहे. संस्थात्मक बदलाशिवाय देशाची प्रगती शक्य नाही. हे पुस्तक देशांला प्रगतीच्या वाटचालीवर विचार करण्यास प्रवृत्त करणारे आहे, विशेषतः भारतासारख्या विकासशील देशांसाठी हे पुस्तक खूप महत्त्वाचे आहे.

**संदर्भ सूची**


1. Kungl, Vetenskaps Akademien, (2024), "The Prize in Economic Sciences 2024" https://www.nobelprize.org/uploads/2024/10/popular-economicsciencesprize2024.pdf
2. The Royal Swedish Academy of Sciences, (2024), "Scientific Background to the Sveriges Riksbank Prize in Economic Sciences in Memory of Alfred Nobel 2024", Stockholm, Sweden https://www.nobelprize.org/uploads/2024/10/advanced-economicsciencesprize2024.pdf
3. Acemoglu Daron, Simon Johnson, James Robinson, (2002), "Reversal of Fortune: Geography and Institution in the Making of the Modern World Income Distribution" The Quarterly Journal of Economics, Vol. 117, No. 4 Nov. Pp. 1231-1294.
4. Acemoglu Daron, Simon Johnson, James Robinson, (2001), "The Colonial Origins of Comparative Development: An Empirical Investigation" The American Economic Review, Vol. 91, No. 5, Dec. Pp. 1369 -1401.


***